## प्रेस नोट

ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ११.०९.२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | आलोसे श्री.परमेश्वर पांडुरंग गाडगीळ, वय–३१ वर्ष, पद–रचना सहायक,नगर रचना कार्यालय,अमरावती रा.c/o श्री.मोरे यांच्या घरी भाडयाने स्वावलंबी नगर,पुष्पक कॉलनी रेल्वे गेट जवळ अमरावती मुळ पत्ता – इटलापुर देशमुख, ता.परभणी जि.परभणी |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ११/०९/२०२३ चे १५/४१ ते १६/१७ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | २०,०००/– रुपये |
| | पडताळणी दरम्यान मागणी केलेली लाच रक्कम | ७,५००/– रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ७,५००/– रुपये |
| ७ | घटनास्थळ | सहायक संचालक, नगररचना कार्यालय, अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक ०८/०९/२०२३ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार हे सिव्हील इंजीनीअर असुन, त्यांचकडे असलेले क्लाईटंचे शेतीचे वाणिज्य प्रायोजनार्थ अकृषक चे ऑनलाईन प्रकरण पुढे पाठविण्याकरीता सहायक संचालक, नगररचना कार्यालय, अमरावती येथील रचना सहायक श्री.गाडगीळ २०,०००/– रु. लाचेची मागणी करत असल्याबाबत लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.११/०९/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान सहायक संचालक, नगररचना कार्यालय, अमरावती येथील रचना सहायक श्री. गाडगीळ यांनी तक्रारदार यांचे क्लाईचे शेतीचे वाणिज्य प्रायोजनार्थ अकृषक चे चे ऑनलाईन प्रकरण पुढे पाठविण्याकरीता तडजोडीअंती ७,५००/– रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले वरुन दिनांक ११/०९/२०२३ रोजी पंचासमक्ष आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री. परमेश्वर पांडुरंग गाडगीळ यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम ७,५००/– रु. पंचासमक्ष स्विकारली वरुन आज रोजी वर नमुद आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरुध्द पो.स्टे.गाडगेनगर जि.अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.शिवलाल भगत, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, श्री.मिलींदकुमार बहाकर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. अमरावती,यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.सतिश उमरे, पो.हे.कॉ.प्रमोद रायपुर, पोहेकॉ राहुल वंजारी, पो.कॉ.आशिष जांभोळे, पो.कॉ.शैलेश कडु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५ मो.न.७०२०६९३४८१, टोल फ्रि नंबर – १०६४.

(सतिश उमरे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.न.९९२२९२३०६९